सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

क्र. २] सोमवार, दिनांक ९ जानेवारी २०२३ : पौष १९, शके १९४४ [किंमत ०.०० रु.]

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग एक-अ औरंगाबाद विभाग

१

**जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांजकडून**

**(नगरपरिषद प्रशासन)**

**वाचा :**

१. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५३ (१), (२)

२. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३४१ ब-१

३. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन राजपत्र दि.२४.०२.२०२२.

४. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांची अधिसूचना क्रमांक एएमसी ५००७/प्र.क्र.२५/नवि ३२ दिनांक १० जून २००९.

५. या कार्यालयाचे पत्र क्रं.२०२२/नपाप्र/का-१/टे-१/प्र.क्र.६ दिनांक २३.१२.२०२२

६. मुख्याधिकारी नगरपंचायत नायगाव यांचे पत्र दिनांक ०२.०१.२०२३.

**आदेश**

**क्रं.२०२२/नपाप्र/का-१/टे-१/प्र.क्र.०६ दिनांक ०६.०१.२०२३.–** ज्याअर्थी, नांदेड जिल्ह्यातील नायगाव नगरपंचायतीच्या विद्यमान अध्यक्षांनी उक्त वाचा १ नूसार दिलेल्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणूकीसाठी उक्त वाचा २ वरील तरतूदीनूसार, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडून उक्त वाचा ३ अन्वये निश्चित केलेल्या अध्यक्ष पदाच्या आरक्षणानूसार व उक्त ४ नूसार या कार्यालयाचे पत्र वाचा ५ अन्वये उक्त नगरपंचायतीच्या अध्यक्ष पदाच्या निवडणूकीसाठी दिनांक ०२.०१.२०२३ रोजी बोलाविण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये, पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बिलोली यांचे अध्यक्षतेखाली, सभेमध्ये अध्यक्षाची निवड बिनविरोध झाली असल्याबाबत, सभेचा कार्यवृतांत मुख्याधिकारी नगरपंचायत नायगाव यांनी वाचा ६ अन्वये या कार्यालयास सादर केला आहे.

त्याअर्थी मी, अभिजित राऊत जिल्हाधिकारी नांदेड, उक्त अधिनियमा अन्वये प्राप्त अधिकारानूसार याव्दारे असे जाहिर करतो की, नांदेड जिल्ह्यातील नायगांव नगरपंचायतीमध्ये दिनांक ०२.०१.२०२३ रोजी अध्यक्षपदाच्या निवडणूकीसाठी बोलाविण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये खालील दर्शविल्याप्रमाणे नगरपंचायतीच्या नावासमोरील नगरपंचायत सदस्य, अधिनियमातील तरतूदीनूसार विहित केलेल्या कालावधीकरीता अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आले आहेत.

**अध्यक्षपदी निवडून आलेल्या उमेदवाराचा तपशिल**

| अ.क्र. | नगरपंचायतीचे नाव | निवडून आलेल्या अध्यक्षाचे नांव | अध्यक्षपदासाठी आरक्षणाचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | नायगाव | मीनाबाई सुरेश1 कल्याण | सर्वसाधारण (महिला) |

ठिकाण : नांदेड

दिनांक : ०६/०१/२०२३

(अभिजित राऊत)

जिल्हाधिकारी नांदेड.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, AURANGABAD-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.